बीड । शनिवार
१२.०७.२०२५
वर्षे : ५ अंक : १०२
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● https://marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१




# बीड नगरपालिकेचा बोगसपणा पुन्हा उघड

## ●कंत्राटी कर्मचारी योगेश हाडे यांची बांधकाम विभागातील बिलावर सह्या कशा ?

## ●मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी हाडेंना मुभा दिली का ?

## ●अभियंता स्वामीनाथ सदगर यांना बांधकाम विभागातून दूर करण्याचे कारण नगरपालिका प्रशासन स्पष्ट करणार का ?

## ●अभियंता किरण देशमुख यांच्या विरोधात तक्रारींचा पाऊस ; जिल्हा प्रशासन कारवाई करणार का ?

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेचा प्रशासकीय कारभार जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला आहे. या ठिकाणी विकास कामांच्या नावावर नगरपालिका फंडातील अनेक कामात बोगसगिरी झाल्याच्या तक्रारी करण्यात आलेले आहेत. दुसरीकडे बीड शहरात मागील तीन दिवसापासून नगरपालिकेने स्वच्छता विभागात कार्यरत असणाऱ्या वाहनांचे डिझेलचे पैसे थकवल्याने पेट्रोल पंप चालकाने वाहनांमध्ये डिझेल टाकण्यास मनाई केल्याने शहरातील विविध भागात कचऱ्याचे ढिगारे साचले आहे याकडे मुख्याधिकारी नीता अंधारे यांचे दुर्लक्ष असून फक्त बांधकाम विभागावर लक्ष दिले जात आहे या ठिकाणी कार्यरत असणारे किरण देशमुख नावाचे अभियंते नगरपालिका कधीच येत नसल्याने विकास कामातील फंड खाजगी कार्यालयातून विलेवाट लावली जात आहे. या कामामध्ये किरण देशमुख यांचे अत्यंत विश्वासू सहकारी योगेश हाडे यांचा सहभाग असून. नगरपालिकेत कंत्राटी पदावर कार्यरत असणारे योगेश हाडे यांना बांधकाम विभागातील बिलावर सह्या

▶▶ उर्वरित पान २ वर


नीता अंधारे


किरण देशमुख


योगेश हाडे

### ●अभियंता स्वामीनाथ सदगर यांना बाजूला करण्याचे कारण काय ?

बांधकाम विभागात काही दिवसापूर्वी कार्यकारी अभियंता पदावर स्वामीनाथ सदगर हे कार्यरत होते अत्यंत कडक शिस्तीचे व बोगस बिलावर कधीही सही न करणारे स्पॉटवर जाऊन पाहणी करत नियमानुसार वागणारे स्वामीनाथ सदगर यांच्या कार्यपद्धतीवर नगरपालिका प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी नाराज असल्याने त्यांना सरळ या पदावरून बाजूला करत नगरपालिका प्रशासकीय विभागात त्यांची बदली करण्यात आली. यामागचे राजकारण बीड शहरातील प्रत्येक नागरिकला माहित आहे. या ठिकाणी किरण देशमुख यांना नियुक्त करताना नगरपालिकेने एका कर्तवनिष्ठ व इमानदार अधिकाऱ्याला बाजूला का केले. किरण देशमुख यांनी बीड नगरपालिका पोखरून काढली आहे. नगरपालिकात न येता खाजगी कार्यालतून दिले काढण्यास माहीर असणारे किरण देशमुख यांच्या विरोधात बीड शहरातील अनेक सामाजिक संघटनासह पत्रकार संघटनांनीही जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार केली आहे या तक्रारीची दखल जिल्हा प्रशासन व नगरपालिका मुख्याधिकारी घेणार का ?

# ‘भोंग्यांच्या दंडातील अर्धी रक्कम तक्रारदाराला देणार’; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईला भोंगे मुक्त करण्याचे काम पोलिसांनी केले आहे. उर्वरीत महाराष्ट्रातील भोंगे बंद करण्यात येतील. त्यासाठी संबंधितांना कायद्याचे पालन करण्यासाठी सुचना देण्यात येतील. राज्यात कुठेही विना परवानगी भोंगे लावल्यास संबंधित पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकाऱ्याला जबाबदार धरण्यात येईल. त्याचबरोबर भोंग्यांच्या दंडातील अर्धी रक्कम तक्रारदाराला देण्यात



येईल, असे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राज्यातील विनापरवागी भोंग्यांच्या मुद्द्यावर विधानसभेत आज (दि.११) चर्चा झाली. यावेळी राज्यातील विविध धार्मिक स्थळांवर लाऊड स्पीकर लावण्यात आले आहेत. त्यामुळे स्थानिक नागरिकांना ध्वनी प्रदूषणाचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे, असे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी निदर्शनास आणून दिले. तर राज्यात वर्षभर सुरू असणारे भोंगे बंद करण्यात यावे, अशी मागणी आमदार देवयानी फरांदे यांनी केली.

येऊर हा राष्ट्रीय उद्यानाचा परिसर आहे. येथे कोणत्याही नियमांचे पालन केले जात नाही. येथे मोठ्या आवाजात भोंगे सुरु असतात. एकेकाळी रस्त्यावर बिबटे दिसायचे. मात्र, आता मांजर ही दिसत नाही. यावर कारवाई केली पाहिजे. कलियुगातील सर्व प्रश्न मुख्यमंत्री यांनी सोडवले आहेत. ▶▶ उर्वरित पान २ वर

# धक्कादायक! मुलीची टीसी मागायला गेलेल्या वडिलांचा संस्थाचालकाच्या मारहाणीत मृत्यू

**परभणी । प्रतिनिधी**

निवासी शाळेतून मुलीचा शाळेचा दाखला काढून आणण्यासाठी गेलेल्या पालकाला संस्थाचालक व त्यांच्या पत्नीने उर्वरित पैसे न भरल्याचा राग मनात धरून मारहाण केली. त्यानंतर बेशुद्ध पडलेल्या पालकाला परभणीच्या दवाखान्यात नेले असता, त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले..

हा प्रकार पूर्णा तालुक्यातील झिरो फाटा येथील हायटेक निवासी शाळेत गुरुवारी घडता. या प्रकरणी पूर्णा पोलिस ठाण्यात मयताच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून संस्थाचालक आणि



त्याच्या पत्नीविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंद झाला.

जगन्नाथ पांडुरंग हेंडगे (४२, रा. उखळद, ता. परभणी) असे मयताचे नाव आहे. याप्रकरणी मुंजाजी रामराव हेंडगे यांनी पूर्णा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. जगन्नाथ हेंडगे यांनी त्यांची मुलगी पल्लवी हिचा प्रवेश तिसरीच्या वर्गामध्ये बाळकृष्ण सेवाभावी संस्था वाडी. तुळजापूर संचलित हायटेक रेसिडेन्शियल स्कूल झिरो फाटा येथे जून महिन्यात घेतला होता. मुलगी पल्लवी ही निवासी शाळेत एक आठवडा राहून सहा जुलै रोजी उखळद येथे परत आली. त्यानंतर शाळेत जायचे नाही, मला तेथे राहायचे नाही, असे म्हणून ती घरीच थांबली. यानंतर १० जुलै रोजी इतरत्र प्रवेश घेण्यासाठी

▶▶ उर्वरित पान २ वर

# जिल्हाधिकारी साहेब बीड़ नगर परिषदेच्या भ्रष्ट कारभाराची चौकशी लावा नसता लोकसेना संघटना आंदोलन करणार: ॲड. इलियास इनामदार

**बीड । प्रतिनिधी**

लोकसेना संघटनेने बीड जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे की बीड़ नगर परिषदेच्या भ्रष्ट कारभाराची चौकशी तात्काळ लावावी नसता लोकसेना संघटना आंदोलन करणार बांधकाम विभागातील न. पा. फंडचे कोट्यावधीचे भ्रष्टाचार करून बोगस बीले उचलून मुख्याधिकारी बांधकाम अभियंता सहाय्यक अभियंता कर्मचारी यांनी कोटयावधीची विल्हेवाट लावली आहे असे अनेक वृत्तपत्रात भ्रष्टाचाराविषयी आलेल्या दररोजच्या बातम्या, सामाजिक कार्यकर्ते व ठढख कार्यकर्ते यांच्या आंदोलनाच्या मागण्या आपण याठिकाणी पाहु शकता. एकीकडे नगरपालिका आम जनतेकडून सक्तीने कर वसूल करत आहे तर दुसरीकडे



या कर वसूलीचा पैसा शहर विकासासाठी व बीड शहरातील मूलभूत सुविधा सुधारण्याऐवजी बांधकाम अभियंता व त्यांच्या बगलबच्च्यांनी काही निवडक कर्मचा-याच्या संगतीने बनावट इस्टीमेट तयार करून, बोगस बिले काढून निधीचा अपहार केला आहे. तसेच नगर पालिकेच्या अनेक विभागात भ्रष्टाचार होताना आपल्याला दिसत आहे मग ते पाणि पुरवठा असेल किंवा इतर दुसरे ▶▶ उर्वरित पान २ वर

# वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री अजितदादांना बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांच्या मदतीचे नियोजनात अपयशी

## १८५ दिवसात तब्बल १३० शेतकरी आत्महत्या ; चौकशीसह मदतीलाही विलंब : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांच्या बीड अवकाळी पाऊस ,नापिकी, कर्जबाजारीपणा आणि बँकांचा कर्ज परतफेडीचा तगादा या प्रमुख कारणांमुळे मनोधैर्य खचलेल्या शेतकऱ्यांनी जिल्ह्यात गेल्या १ जानेवारी २०२५ ते १४ जुलै २०२५ या



१८५ दिवसात तब्बल १३० शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन त्यापैकी ९३ प्रकरणे पात्र ठरली आहेत तर १९ प्रकरणे मदतीस अपात्र ठरविण्यात आली असुन १८ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत. विशेष म्हणजे यात पात्र अपात्रतेचा घोळ सुरूच असुन फेब्रुवारी, मे,जुन या महिन्यांतील प्रकरणांचा चौकशी अहवाल अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना मदतीचे नियोजन जमेना असे म्हणण्याची वेळ ▶▶ उर्वरित पान २ वर

# तलावात पडलेल्या चतुर कोल्ह्याला वाचवले



**कडा । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील शिरापुर येथे दोन दिवसापासून शेत तलावात पडलेल्या कोल्हयाची कडा येथील जीवदया फाऊंडेशनच्या प्राणीमित्राकडून जीवदान दिल्याची घटना घडली, याबाबत माहीती अशी की शिरापुर येथील रामदास देवकर यांच्या शेततलाव मध्ये दोन दिवसा पासून एक राखाडी कोल्हा पडलेला होता, कोल्हाने वर येण्यासाठी खुप प्रयत्न केले परंतु त्याला वर येत नसल्याने तो ▶▶ उर्वरित पान २ वर

# कर्तव्यदक्ष आ. नमिता मुंदडानी मांडला बुट्टेनाथ तलावाचा प्रश्न

## २,३ टी एम सी पाणी मांजरा धरणाला जायकवाडी धरणातून मिळावे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

११जुलै रोजी पावसाळी अधिवेशनात होत असलेल्या लक्षवेधी मध्ये केज मतदार संघाच्या कर्तव्यदक्ष आमदार नमिताताई मुंदडा यांनी केज, अंबाजोगाई, धारूर, यासाठी मांजरा धरणा तून पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न अधिवेशनात मांडला.

त्याचबरोबर जायकवाडी धरणातून दोन ते तीन टी.एम. सी पाणी मिळावे याकरिता उपाय योजना करण्यात याव्यात व अंबाजोगाई शहरालगत असलेल्या बुट्ठेनाथ तलावाबाबत प्रश्न सभागृहात मांडता त्याला उत्तर देताना



माननीय मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जायकवाडी धरणातून मांजरा धरणासाठी ९० किलोमीटर अंतर लिफ्ट द्वारे पाणी आणण्याचा प्रस्ताव सरकार समोर ठेवला व बुटे नातं धरणासाठी काय उपाय करता येईल त्याचबरोबर केज मतदार संघातील पाझर तलाव याची माहिती घेऊन व त्याबाबत केज मतदार संघात बैठक घेण्याचे आश्वासन दिले.

पावसाळी अधिवेशनात आज मांडण्यात आलेल्या लक्षवेधी कडे नक्कीच सर्वांचं लक्ष गेलं ते कारण म्हणजे केज मतदार संघातील कर्तव्यदक्ष आमदार नमिता मुंदडा यांच्या प्रयत्नाला यश येईल यावरून दिसून येत आहे.






# वेगळ्या वेशभूषेतील गणेशमूर्ती बसवणे अयोग्यच !

श्री गणेशाचे रूप कसे आहे याचे यथोचित वर्णन श्री गणपती अथर्वशीर्षात आहे. गणेशचतुर्थीच्या निमित्ताने घरोघरी तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांत बसवण्यात येणाऱ्या गणेशमूर्तींही तशाच असायला हव्यात; मात्र प्रत्यक्षात असे घडताना दिसत नाही. हल्ली बहुतांश सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये श्री गणेशाच्या मूर्तीपेक्षा सजावटीला अधिक प्राधान्य दिले जात असल्याने त्यानुरूप विविध वेशभूषेतील मुर्त्या आणल्या जातात. मुंबईतील काही मंडळांत भव्य गणेशमूर्ती हेच गणेशभक्तांचे आकर्षण केंद्र असल्याने काहीतरी वेगळे करायचे म्हणून दरवर्षी वेगवेगळ्या स्वरूपात आणि अन्य देवतांच्या, अवतारांच्या वेशभूषेत गणेशमूर्ती साकारल्या जातात. गणेशमूर्ती बनवणाऱ्या कारखान्यांमध्ये फेरफटका मारला असता यंदाही अनेक गणेशोत्सव मंडळांनी छत्रपती शिवाजी महाराज, भगवान श्रीकृष्ण, प्रभू श्रीराम, भगवान श्री शंकर, श्रीविष्णू, स्वामी समर्थ, साईबाबा आदींच्या वेशभूषेत गणपतीच्या मूर्ती बनवण्यासाठी ऑर्डर्स दिल्या आहेत. सर्व देवता आणि अवतार हे भक्तांचे कल्याण आणि दृष्ट प्रवृत्तीचा संहार करणाऱ्याच असल्या तरी प्रत्येक देवतेचे कार्य वेगवेगळे आहे, तसे त्यांचे उत्सवही



वेगवेगळे आहेत, कृष्णजन्माष्टमीला आपण श्री गणेशाची मूर्ती घरी आणत नाही किंवा श्री रामनवमीला श्री गणेशाची शोभायात्रा काढत नाही मग श्री गणेश चतुर्थीच्या वेळी गणेशाला विविध वेषभूषांत का दाखवतो ? हिंदू धर्मातील प्रत्येक देवतेला विशिष्ट आकार आणि विशिष्ट वेशभूषा आहेत. त्यातून सिद्ध होणाऱ्या प्रतिमेतून अथवा मूर्तीतून त्या त्या देवतेचे तत्व आणि चैतन्य प्रक्षेपित होते असे धर्मशास्त्र सांगते. त्यामुळे मूर्तीला श्रीरामाच्या मूर्तीचा आकार दिला आणि शीर केवळ श्रीगणेशाचे लावले कि ती मूर्ती शत प्रतिशत श्रीगणेशाची होत नाही. कारण शरीराचे अन्य अवयव आणि वेशभूषा ही श्रीरामाचीच असणार आहे. त्यामुळे श्रीगणेशमूर्तीवर असे प्रयोग करणे योग्य नाही. स्वामी समर्थांचे काही भक्त घरी स्वामींच्या वेशभूषेतील गणपती आणतात. साईबाबांचे भक्त साईबाबांच्या वेशभूषेतील गणेशमूर्ती बनवून घेतात तर छत्रपती शिवरायांचे कट्टर शिवभक्त चक्क छत्रपती शिवरायांच्या वेशातील गणेशमूर्ती ऑर्डर करून बनवून घेतात. अशा प्रकारच्या गणेशमूर्ती गणेशचतुर्थीच्या दिनी घरी आणणाऱ्याचा त्या त्या संतांविषयी आणि महापुरुषांविषयी श्रद्धेचा भाग असला तरी अशा प्रकारे आपल्या प्रतिमेला विघ्नहर्त्या श्रीगणेशाच्या स्वरूपात दाखवणे स्वामींना किंवा छत्रपती शिवरायांना कधीतरी आवडले असते का, याचा विचार ही मंडळी का करत नाहीत.

घरातील बच्चे कंपनीवर कार्टून विश्वातील पात्र, सुपरमॅन, बॅटमॅन यांसारख्या व्यक्तीरेखा यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात असतो त्यामुळे त्यांना खुश करण्यासाठी या पात्रांच्या रूपात गणेशमूर्ती साकारण्याच्या ऑर्डर्स पालकांकडून दिल्या जातात. अशा काल्पनिक पात्रांच्या वेशात श्रीगणेशाला साकारणे हा श्रीगणेशाचा अवमान नव्हे का ? गणेश चतुर्थीच्या दिवशी घरी आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीच्या माध्यमातून साक्षात श्रीगणेशच आपल्या घरी अवतरणार आहेत. जोपर्यंत ते आपल्या घरी विराजमान आहेत तोपर्यंत त्यांची आपल्याला मनोभावे सेवा करायची आहे हा भाव २४ तास जागृत राहण्यासाठी श्रीगणेशमूर्तीही शास्त्रात सांगितल्याप्रमाणे चौरंगावर किंवा आसनावर विराजमान असलेली हवी. वेगवेगळ्या व्यक्तिरेखांच्या स्वरूपातील श्रीगणेशाला १० दिवस पुजून अनंत चतुर्दशीला या पुजलेल्या मूर्तीचे जेव्हा आपण विसर्जन करतो. तेव्हा हे विसर्जन नेमके श्री गणेशाच्या मूर्तीचे होते कि अन्य देवता, संत आणि महापुरुष यांच्या मूर्तींचे ? याचा विचार अशा मुर्त्या घरी आणणाऱ्यांनी करायला हवा. काही मंडळांमध्ये किंवा घरच्या सजावटींमध्ये श्री गणेशमूर्तीला चलचित्राच्या स्वरूपात दाखवले जाते, काही ठिकाणी पेटित पैसे टाकल्यावर श्रीगणेशमूर्ती उभी राहून पैसे टाकणाऱ्याला लाडूचा प्रसाद देतानाचे प्रयोजन केलेले असते. विविध धातूंच्या भांड्यांपासून, फळांपासून, सुक्यामेव्यापासून, चॉकलेटपासून गणेशमूर्त्या बनवल्या जातात. हासुद्धा श्रीगणेशाचा अवमानच आहे. गणेशोत्सवाच्या दरम्यान काही कंपन्या व्यावसायीक हेतूने श्रीगणेशाचा वापर आपल्या जाहिरातींमध्ये करतात. अशांवर गणेशाची कृपा होईल का ? आपल्याला पुरेसे धर्मशास्त्र ज्ञात नसल्याने धार्मिक सणांच्या आणि उत्सवांच्या बाबतीत 'मला सर्व कळते' या विचाराने आपण हवे तसे वागतो, हवे तसे करतो. धार्मिक सण शास्त्रीय दृष्ट्या कसे साजरे करावेत याबाबतचे सविस्तर लिखाण आपल्या ऋषीमुनींनी प्राचीन धर्मग्रंथांत हजारो वर्षांपूर्वीच मांडून ठेवले आहे. ते तसे साजरे केल्याने मनुष्याला उचित लाभ होतो आणि आनंदही मिळतो. याउलट आपण आपल्याच मनाप्रमाणे कारण्याचा प्रयत्न केल्यास लाभ तर होणार नाही उलट हानीच होण्याचा अधिक संभव असतो.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

पान १ वरून पुढे...

## बीड नगरपालिकेचा...

करण्याचा अधिकार कोणी दिला. मुख्याधिकारी नीता अंधारे यांचे या कर्मचाऱ्यांना पाठबळ आहे का ? नगरपालिकेत कार्यकारी अभियंता पदावर रुजू झालेले स्वामीनाथन सदगर यांना या पदावरून बाजूला सारत नगरपालिकेत कधीही न येणाऱ्या कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांच्याकडे बांधकाम विभागाचा पदभार सोपवण्याचा ऐतिहासिक निर्णय मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी का घेतला . बीड नगरपालिकेचा बोगस पुन्हा उघड झाला असून कंत्राटी कर्मचारी असणारे योगेश हाडे यांना थेट बांधकाम विभागातील बिलावर सह्या करण्याचा अधिकार कोणी दिला. मागील अनेक बिलावर योगेश हाडे यांच्या स्वाक्षऱ्या असून कोणत्या अधिकारात या स्वाक्षऱ्या योगेश हाडे यांनी केले आहे. विशेष म्हणजे योगेश हाडे यांच्याकडे पंतप्रधान घरकुल योजनेचा पदभार असताना बांधकाम विभागातील बिलावर सह्या का करण्यात येत आहेत. किरण देशमुख नावाचे अभियंते यांच्याकडे पदभार दिल्यापासून बीड नगरपालिकेत कधीही उपस्थित नसलेल्या या अभियंत्याचे वेतन नगरपालिका का देत आहे.

## 'भोंग्यांच्या दंडातील...

हा ही कलियुगातील प्रश्न आहे. तो ही सोडवला पाहिजे, अशी मागणी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केली. या चर्चांना उत्तर देताना फडणवीस म्हणाले की, राज्यात विनापरवागी पुन्हा भोंगे लावण्याचा प्रयत्न केल्य़ास कारवाई करण्यात येणार आहे. आतापर्यंत राज्यातील ३ हजार ३३७ धार्मिक स्थळावरील भोंगे हटविण्यात आले आहेत. मुंबईतील एकाही धार्मिक स्थळावर भोंगा नाही. मुंबई पोलिसांनी १६०८ भोंगे हटविले आहेत. यावेळी कोणताही धार्मिक तणाव झालेला नाही. मुंबईला भोंगे मुक्त करण्याचे काम पोलिसांनी केले आहे. पुन्हा भोंगे लावले, तर ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत जो अधिकारी असेल, त्याला जबाबदार धरले जाणार आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, जंगलात कोणतेही वाद्य वाजवता येत नाही. यासाठी वन विभाग आणि पोलिसांना सुचना देण्यात येतील. सर्वच पोलिस आयुक्त यांच्या कार्यालय अंतर्गत भरारी पथक स्थापन केले जाईल. दरम्यान, ठाकरे शिवसेनेचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांच्या उत्तरावर त्यांचे अभिनंदन केले.

## धक्कादायक! मुलीची....

तिचा या शाळेतील दाखला काढून आणण्यासाठी जगन्नाथ हँडगे आणि नातेवाईक गुरुवारी सायंकाळी पाच वाजता हायटेक रेसिडेन्शिअल स्कूलवर गेले होते. त्यावेळी जगन्नाथ हेंडगे हे शाळेच्या मुख्य कार्यालयात गेले तर सोबतचे नातेवाईक मुख्य प्रवेशद्वारावर थांबले होते. यानंतर १५ ते २० मिनिटांनी आरडाओरड करत घाबरलेल्या अवस्थेत जगन्नाथ हेंडगे तेथून बाहेर पडले. यावेळी नातेवाईकांनी काय झाले असे विचारले असता त्यांनी संस्थाचालक प्रभाकर चव्हाण व त्यांच्या पत्नीने लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याचे सांगितले व उर्वरित रक्कम द्या, असे म्हणून पुन्हा मारहाण केली. घटनेनंतर नमूद दोघे हे तेथून निघून जा नाहीतर तुमच्यावर केस करतो, असे म्हणून कारमध्ये बसून निघून गेले. जगन्नाथ पेंडगे यांना जबर मार लागल्याने ते जागीच बेशुद्ध झाले. त्यांना परिसरातील काही नागरिक व नातेवाईकांनी परभणीत एका दवाखान्यात आणले असता तेथील डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. घटनेने सर्वत्र हळहळ. याप्रकरणी मुंजाजी हेंडगे यांच्या फिर्यादीवरून प्रभाकर चव्हाण व त्यांची पत्नी अशा दोघांविरुद्ध पूर्णा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली. त्यानुसार कलम १०३ (१) ११५ (२), ३५२, ३ (५) बीएनएस प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पोलीस निरीक्षक विलास गोबाडे करीत आहेत. घटनास्थळी पूर्णाचे उपविभागीय पोलीस अधिकारी समाधान पाटील यांच्यासह पोलीस निरीक्षक गोबाडे यांनी भेट दिली. शुक्रवारी नमूद शाळेच्या परिसरात पोलीस यंत्रणेने बंदोबस्त तैनात केला होता. मयताचा मृतदेह गुरुवारी रात्री जिल्हा रुग्णालयात आणण्यात आला होता. मयत जगन्नाथ यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, मुलगा असा परिवार आहे. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## जिल्हाधिकारी साहेब...

विभाग असेल बीड जिल्हाधिकारी साहेबांनी जानेवारी २०२३ ते २०२५ च्या आज तारखेपर्यंतचे ऑडिट करण्याचे निर्देश देवून झालेल्या भ्रष्टाचाराची पोल खोल करावी नसता लोकसेना संघटना जन आंदोलन करणार आहे असा इशारा जिल्हा प्रशासनाला लोक सेना संघटना प्रमुख ड. इलियास इनामदार यांनी दिलेला आहे.

## वित्त व नियोजन मंत्री...

आली आहे.आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना तातडीने शासकीय मदतीसाठी निधी उपलब्ध करून देऊन कुटुंबाची परवड थांबवावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे. अवकाळी पाऊस,नापिकी, कर्जबाजारीपणा आणि बँकांचा कर्ज परतफेडीचा तगादा या प्रमुख कारणांमुळे मनोधैर्य खचलेला शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतो. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना १ लाख रुपयांची शासकीय मदत दिली जाते. बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित असुन शासनामार्फत दिली जाणारी मदत वेळेवर मिळणे बंधनकारक असतानाही महिनोंमहिने शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला जात नसल्याने कुटुंबाची परवड होत आहे. दि.२८ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः शेतकरी आत्महत्यांचे प्रकरण मार्गी लावण्यासाठी महिन्यातून २ बैठका घेणार असल्याचे तसेच तालुका स्तरावरून तहसीलदारांना आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांचे प्रस्ताव १५ दिवसात जिल्हा समितीकडे पाठवण्याचे याबरोबरच जिल्हास्तरीय समितीने पात्र केलेल्या कुटुंबियांना शासकीय मदत देण्याची प्रक्रिया पुढील १५ दिवसांत पूर्ण केली जाणार असुन महिनाभरात आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना आर्थिक मदत मिळणार असल्याची माहिती दिली होती.मात्र हे आश्वासन हवेतच विरल्याचे दिसुन येते. कारण आजही १८ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित असुन जुलै महिना अर्धा होत असताना फेब्रुवारी आणि मार्च महिन्यातील प्रत्येकी १ तसेच मे महिन्यातील २ ,जुन महिन्यातील १० आणि जुलै महिन्यातील ४ प्रकरणांचे अहवाल प्रलंबित आहेत. मदतीसाठी सुद्धा अशीच दिरंगाई सुरू असुन मे महिन्यातील २,जुन महिन्यातील ७ आणि चालु महिन्यातील ४ प्रकरणे आजही मदतीसाठी प्रलंबित आहेत. सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा बळी ठरत असताना शासन आणि प्रशासन दोन्ही स्तरावरील अनास्थेमुळे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांचे हाल होत आहेत. त्यामुळे एकंदरीतच जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे महिन्यातुन २ वेळा बैठक आणि महिनाभरात आर्थिक मदत देण्याचे आश्वासन हवेतच विरल्याची प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली. एकुण १ जानेवारी २०२५ ते ४ जुलै २०२५ दरम्यान १८५ दिवसांत १३० शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन त्यापैकी ९३ प्रकरणे पात्र ठरली असुन १९ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली असुन विशेष म्हणजे आजही १८ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत. या कालावधीत ८४ लाख रुपयांची मदत देण्यात आली असुन सन २०२५ मधील १८ शेतकरी आत्महत्या प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित असुन प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याची दक्षता घेण्यात येत असल्याचे तहसीलदार (महसूल-१) जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांनी विभागीय आयुक्तांना शेतकरी आत्महत्या बाबत अहवाल सादर केला आहे.

## तलावात पडलेल्या...

पाण्यात धडपडत होता हे पाहून युवराज देवकर यांनी कडा येथील प्राणीमित्र नितीन आळकुटे यांना या घटनेची माहीती दिली माहीती मिळताच आपल्या जीवदया टिम ला सोबत घेऊन शिरापुर गावात गेले शेत तलावातील कोल्हा पोहून पोहून दमला होता त्याचा जीव कासावीस झाला होता तरीही तो चतुरपणा दाखवत पाण्यात चकवा देत होता अखेर धाडस दाखवत त्याला काढण्यात यश आले. तलावात उतरून कोल्ह्याचा जीव वाचवण्यासाठी प्राणीमित्र नितीन आळकुटे, राजु भोजने, शैलेंद्र मिश्रा, गणेश पवळ यांनी प्रयत्न करत त्याला सुखरूप बाहेर काढले, बाहेर काढलेला चतुर कोल्हा

पान ४ वरून पुढे...

## साहित्यरत्न लोकशाहीर....

न्याय भवन, नगर रोड, बीड येथे सकाळी १० ते सायंकाळी ६.१५ (सुट्टीचे दिवस वगळून) स्वीकारली जात आहेत. स्वत: अर्जदाराने मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहून कर्ज प्रस्ताव दोन प्रतीत सादर करावा. त्रयस्थ, मध्यस्थांमार्फत कर्ज प्रकरण स्वीकारण्यात येणार नाही. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्ष असावे. वार्षिक उत्पन्न ₹ तीन लाखांपेक्षा अधिक नसावे. महामंडळाच्या योजनेचा पूर्वी लाभ घेतलेला नसावा, अशी अर्हता आहे. जात व उत्पन्न प्रमाणपत्र, रेशन व आधार कार्ड, पॅन कार्ड, दोन पासपोर्ट फोटो, व्यवसायाचे दरपत्रक, जागेचे पुरावे, ना-हरकत प्रमाणपत्र किंवा शॉप क्ट, अनुभव व शैक्षणिक प्रमाणपत्रे, सिबिल क्रेडिट स्कोअर (५००), आधार संलग्न बँक खाते तपशील व स्व-स्वाक्षरीत प्रत, महामंडळाच्या विहित नमुन्यातील झेरॉक्स हस्तलिखित, टंकलिखित केलेला अर्ज (महामंडळाच्या कार्यालयात विनामुल्य उपलब्ध) व इतर अनुषंगिक कागदपत्रे प्रस्तावासोबत असावीत, असेही श्रीमती बोराडे यांनी कळवले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी महामंडळाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी आवाहन केले आहे.

## राज्यांतर्गत पीक ..

(आदिवासी असल्यास), आणि पिकाखालील क्षेत्राचा चिन्हांकित नकाशा आवश्यक आहे. मूग व उडीदसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३१ जुलै २०२५ असून, उर्वरित पिकांसाठी ती ३१ ऑगस्ट २०२५ आहे. स्पर्धेबाबत अधिक माहिती व मार्गदर्शक सूचना कृषी विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in संकेतस्थळावर आहेत. तसेच शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी एस. एम. साळवे यांनी केले आहे.

## संपादकावर हल्ला...

त्यानंतर काल रात्री उशिरा संस्था चालक मिर्झा सईद बेग व शिक्षक कागजी एकरार या दोघांविरूध्द पत्रकार संरक्षण कायद्यासह बीएनएस ४, ११५(२), ३५२, ३५१ (२), ३(५) प्रमाणे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. बीड येथील दै.बीड संघर्षचे संपादक मोहम्मद खमरूल इमान खान जफर खान नाझ यांच्या फिर्यादीवरून बातम्या छापल्याच्या रागातून हल्ला करणारे मिर्झा सईद बेग अन्वर बेग आणि शिक्षक एकरार अहेमद असरार अहेमद कागजी (दोघे रा.बीड) यांच्या विरूध्द शिवीगाळ करून मारहाण करणे, जिवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान दि.५ जुलै २०२५ रोजी संपादक खमरूल इमान यांच्यावर हल्ला झाला होता. त्याचवेळी खमरूल इमान यांनी बीड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. मात्र पोलीसांनी केवळ एनसी दाखल करून वेळ मारून घेण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी, अमजद खान, शेख ताहेर, शेख आयशा, शेख वसीम, शेख अय्युब, दिपक थोरात, रईद खान, सिराज आरजू, जावेद पाशा, शेख इरफान, समीर काझी आदिंच्या शिष्टमंडळाने पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांची भेट घेऊन या प्रकरणात पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून सईद बेग यांच्या सर्व शाळा व संस्थांची सखोल चौकशी करण्याबाबत निवेदन दिले होते. सदरील निवेदनाची दखल घेत पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी तात्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानुसार रात्री उशिरा बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## जयभवानीचे नऊ...

चेअरमन भाऊसाहेब नाटकर, भवानी बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, उपसभापती विकास सानप, यांच्यासह संचालक कुमारराव ढाकणे, जगन्नाथ शिंदे, आप्पासाहेब गव्हाणे, राजेंद्र वारंगे, श्रीराम आरगडे, जगन्नाथ काळे, बाबुराव काकडे, नारायणराव नवले, शरद चव्हाण, सुनील पाटील, संदीपान दातखिळ, नंदकिशोर गोरडे, जगन्नाथ दिवाण आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, जयभवानी सहकारी साखर कारखान्याची च्या ४३ व्या गळीत हंगामाची जय्यत तयारी सुरू असून कारखान्याने मागील गळीत हंगामात ४ लाख ४१ हजार ५७१ मेट्रिक टन ऊस गाळप करून ३ लाख ९० हजार ३९० टन साखर उत्पादन झालेले आहे तर १०.४१ टक्के सरासरी साखर उतारा आलेला आहे. आसवणी प्रकल्पामधून ६६.९० लाख बल्क लिटर एवढे बी-हेवी स्पिरीट उत्पादित झालेले आहे. गळीत हंगाम २०२५-२६ साठी कार्यक्षेत्रात १४ हजार हेक्टर ऊसाची नोंद झाली असून त्यापासून अंदाजे १०.५० लाख मेट्रीक टन ऊस गाळपास उपलब्ध होईल. बिगर नोंदीचा ४ हजार हेक्टर ऊस असून त्यापासून ३ लाख मेट्रिक टन ऊस उपलब्ध होणार असून एकूण १३.५० लाख मेट्रिक टन ऊस कारखाना कार्यक्षेत्रात उपलब्ध आहे. त्यापैकी कारखान्याने ९ लाख मेट्रिक टन गाळपाचे उदिष्ट ठरविलेले आहे.यावेळी हनुमान कोकणे, चंद्रकांत पंडित, गणपतराव राठोड, जयदीप औटी, फुलचंद बोरकर, उद्धव पैठणे, रावसाहेब काळे, बळीराम रसाळ, दिनकर काळे, सुभाषराव मस्के, किरण वावरे, कारखान्याचे जनरल मॅनेजर दत्तात्रय टेकाळे, कार्यकारी संचालक राजेंद्र खाडप, चिफ इंजिनिअर अशोक होके, चीफ इंजिनिअर ऋषिकेश देशमुख, प्रॉडक्शन मॅनेजर गजानन वाळके, मुख्य शेतकी अधिकारी सुदामराव पघळ, मुख्य लेखापाल सौरभ कुलकर्णी, डिस्टलरी इनचार्ज राजेंद्र बडे, डिस्टलरी इनचार्ज दिनेश बिरकुटे, चीफ केमिस्ट श्रीमंत जाधव, चिफ केमिस्ट सिव्हील इंजिनिअर भालचंद्र कुलकर्णी, सुरक्षा अधिकारी एस.एन.औटे, संगणक विभागाचे धनाजी भोसले, खरेदी विभागाचे सुशांत सोळंके, ऊस पुरवठा अधिकारी वच्छिष्ट कुटे, हेड टाईम किपर सचिन उधे, कार्यालयीन अधीक्षक गोविंद चव्हाण, केनयार्ड सुपरवायझर ज्ञानेश्वर जामकर, स्टोअर किपर राजेंद्र ढेंगळे, डॉ. संभाजी पवार, उद्धव पारे, ऋषिकेश शिंदे, महेश गुंजाळ, विष्णु गायकवाड यांच्यासह कामगार, कर्मचारी, अधिकारी, सभासद, ऊस उत्पादक शेतकरी व ऊस तोडणी वाहतुक ठेकेदार, कार्यक्रमास उपस्थित होते.

## बीड जिल्हयातून...

नावे सर्व जिल्हावाशीयांच्या मनात व ओठांवर आहेत. सध्या महाराष्ट्र राज्याचे पावसाळी अधिवेशन विधान भवन मुंबई येथे चालू आहे.या अधिवेशनादरम्यान स्वेच्छा सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी व सध्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे नेते प्रा.ईश्वर मुंडे व पुणे महानगर पालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांची भेट झाली.उभयतांनी स्मीत हास्य,प्रेमाणे हस्तांदोलन केले.बीड जिल्ह्यातील विविध विषयांवर थोडक्यात चर्चा केली. जिल्हयाचे तत्कालीन जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांनी बीड जिल्ह्यात नाविन्यपूर्ण काम केले होते.त्यांची बीड नंतर जिल्हाधिकारी संभाजीनगर,जिल्हाधिकारी पुणे,पंतप्रधान कार्यालय दिल्ली येथे बदली झाली.आता ते पुणे महानगर पालिकेचे आयुक्त आहेत. प्रा.ईश्वर मुंडे व नवल किशोर राम यांची भेट म्हणजे अधिकारी बीड जिल्ह्यातून बदलून गेले तरी जिल्हयातील लोक आठवणी,प्रेम व जिव्हाळा कायम ठेवतात हेच सिध्द होते.

## बीड तालुक्यातील ...

कविता जाधव, संपर्क अधिकारी म्हणून बीड तालुक्यासाठी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बीड गट विकास अधिकारी यांच्याकडून ग्रामपंचायतीची यादी व सन २०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जाती, जमातीच्या लोकसंख्येच्या आधारे माहिती मागविण्यात आली आहे. सर्व ग्राम महसूल अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त ग्राम पंचायतच्या नोटीस बोर्डवर, चावडीवर सरपंच पदाच्या आरक्षणाची अधिसूचना, परिशिष्ट प्रसिद्ध करावी, सोडतीचा दिनांक, वेळ प्रसिद्ध करून प्रसिद्धी पंचनामा मागविण्यात आला असल्याचेही बीड तहसील कार्यालयाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे.

## लाचखोर मुख्याधिकारी...

यांच्यासह अशोक नागरगोजे, राजेंद्र सिनकर यांच्या पथकाने चव्हाणला रंगेहाथ पकडले. त्यावेळी घेतलेल्या घराच्या झडतीत रोख ९४ हजार ८०० रुपयांची रक्कम आढळून आली. त्यानंतर त्यांना शहर पोलीस ठाण्यात रात्री बाराच्या सुमारास आणून ठेवण्यात आले. शुक्रवारी दुपारी तीनच्या सुमारास चंद्रकांत चव्हाण यांना येथील न्यायालयात हजर करण्यात आले असता अतिरिक्त सत्र न्यायाधीश राजश्री प.परदेशी यांनी चव्हाण यांना सोमवारी पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली. शासनाचे वतीने सरकारी वकील रणजीत वाघमारे यांनी तर चव्हाण यांच्या वतीने शरद सोळंके यांनी काम पाहिले.

**चंद्रकांत चव्हाण यांना गुरुवारी रात्री बाराच्या सुमारास ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणण्यात आले होते, त्यानंतर तत्काळ आरोग्य तपासणी करणे आवश्यक असताना तसे न करता तब्बल १२ तासांनी म्हणजे शुक्रवारी दुपारी बाराच्या सुमारास चंद्रकांत चव्हाण यांना येथील ग्रामीण रुग्णालयात नेऊन तेथे आरोग्य तपासणी करण्यात आली. या बारा तासाच्या दरम्यान चव्हाण यांना पोलीस उपनिरीक्षक माकने जेथे बसतात त्या रूममध्ये त्यांच्या खुर्चीवर बसवण्यात येऊन बडदास्त ठेवण्यात आली.तेथे त्यांचे नातेवाईक उपस्थित होते.**

## विद्यार्थ्यांनी दर्जेदार...

अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष श्री.विक्रम (बप्पा) मुंडे यांची उपस्थिती होती तर श्री.उद्धव पटाईत गुरुजी,श्री.डी.एल नागरगोजे सर,राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष श्री.बप्पासाहेब घुगे, भाजपाचे तालुकाध्यक्ष भगवान केदार यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध विद्यालय,महाविद्यालय,व्यावसायिक अभ्यासक्रमातील २०० हून अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल, श्रिफळ, ट्रॉफी देऊन गुणगौरव करण्यात आला. स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी दर्जेदार शिक्षणातून उज्ज्वल भविष्य घडवले पाहिजे असे मनोगत जिल्हा परिषदेचे सदस्य विजयकांत मुंडे यांनी व्यक्त केले. यावेळी भगवान सेनेचे अध्यक्ष मुरलीधर (बप्पा) ढाकणे,माजी पंचायत समिती सदस्य वसंत (भाऊ) केदार, सखाहरी (तात्या) गदळे,श्री.अतुल (दादा) मुंडे, प्रा.माधूरीताई मुंडे, देवगावच्या सरपंच सौ.रूपालीताई मुंडे, दहिफळचे सरपंच डॉ.शशिकांत गदळे, सांगवीचे सरपंच संजय केदार, पिंपळगावचे सरपंच सचिन गायकवाड,आंधळेवाडीचे सरपंच नामदेव आंधळे,सारुळचे सरपंच बालाजी ढाकणे,एकुरका गावचे सरपंच प्रशांत केदार,माजी सरपंच श्रीहरी केदार,विठ्ठल मुंडे,रामा आबा मुंडे, बालासाहेब ठोंबरे,श्री.तुळशिराम नांदे,पी.डी.आबा मुरकुटे,मुकादम ज्योतिराम आंधळे,रिधाकिसन मुंडे,राजेंद्र देशमुख,कृष्णा बँकेचे उपाध्यक्ष चंद्रकांत कुलकर्णी,मुख्य कार्यकारी अधिकारी वसुदेवराव मुंडे,शिवरामपुरी पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुळे, मुख्यकार्यकारी अधिकारी सुनिता पवार,लिंबराज ढेंगे,प्रा.सचिन हांगे,प्रा.अनंत आघाव,प्रा.संजय आबा मुंडे,प्रा.मुळे,प्रा.श्रीराम वायबसे,प्रा.सदाशिव मुंडे,प्रा.राम काटकर यांच्यासह सर्व विद्यालयाचे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.दरम्यान कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.प्रविन कान्हेरे सर यांनी केले.

## वैद्यनाथ विद्यालयाच्या...

शिक्षकांनी भेट घेऊन चर्चा केली व निवेदन देण्यात आले.या चर्चेत भ्रष्टाचार निर्मूलन समिती नामक असलेल्या समितीचा अध्यक्ष सादेक बाबामिया इनामदार यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद असलेल्या खोट्या तक्रारीचा मुळ दस्तावेज दाखत पर्दाफाश केला असुन प्रसार माध्यमाना खोटी माहिती देऊन शाळेची आम्हा शिक्षकांची बदनामी केली आहे यामुळे आमची बदनामी झाली आहे.यामुळे आमच्या बदनामी बाबत रणजित देशमुख व सादेक इनामदार जबाबदार असल्याने ५ कोटीचा अब्रुनुकसानीचा दावा ठोकणार असल्याचे संबंधित शिक्षकांनी पवित्रा घेतला आहे. नविन कार्यकारणी कार्यरत नसल्यामुळे तसेच चएझड रलीं मधील तरतूद नुसार खाजगी संस्थेमध्ये नवीन नियुक्ती देण्याचे संपूर्ण अधिकार फक्त नि फक्त खाजगी व्यवस्थापनालाच असल्यामुळे सादेक इनामदार यांच्या नातेवाईकाचे बेकायदेशीर नियुक्तीचे काम होत नसल्यामुळे हे दोघे अशा प्रकारची खोटी माहिती देवून,खोट्या बातम्या देवून शाळेतील कर्मचाऱ्यांवर व शिक्षण विभागाच्या विविध कार्यालयावर दबाव टाकत आहेत. परंतु यांच्या खोट्या बोगस तक्रारी आहेत असे पत्रकार परिषदेत शिक्षकांनी सांगितले. या पत्रकार परिषदेत संजय सोपान गुट्टे (स.शि.),देशमुख प्रतिभा प्रसादराव (स.शि.),लोखंडे राणी तुकाराम (स.शि.),कटारे अमोल बालासाहेब (स.शि.),भोसले वैशाली विठ्ठलराव (स.शि),देशमुख गोविंद गुलाबराव (स.शि.), आरसुळे ज्योती बालकृष्ण (स.शि.), सातपुते विष्णू लिंबाजी (लिपीक),काळमळी जगन्नाथ वैजनाथ (लिपीक), रोहित प्रमोद काळे (लिपीक),देशमुख शारदा गुलाबराव (स.शि.), शर्मा पुनम दिपक (स.शि.),अंजली अशोक कुटे (स.शि.), बाबासाहेब संतराम किरवले (स.शि.)शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# गुरु पौर्णिमेनिमित्त विवेकानंद गुरुकुल मध्ये मातृ-पितृ पूजन संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

शहरामध्ये गेल्या वीस वर्षापासून कार्यरत असणाऱ्या जय भवानी सेवा संस्थेद्वारा संचलित व महाराष्ट्र गुरुकुल शिक्षण संशोधन परिषद शि सलग्न असणाऱ्या विवेकानंद गुरुकुल म ध्ये विद्यार्थ्यांचे प्रथम गुरु असणारे आई आणि वडील यांचे मुलांच्या हस्ते पूजन संपन्न झाले.



निवासी शिक्षण क्षेत्रामध्ये गेल्या वीस वर्षापासून आपले अस्तित्व टिकवून ठेवणारे जय भवानी सेवा संस्थेचे विवेकानंद गुरुकुल अत्यंत सक्षमपणाने मुलांसाठी काम करत आहे. दरवर्षीप्रमाणे आयोजित केलेल्या गुरुपौर्णिमा निमित्त च्या पालक मेळाव्यासाठी सर्व पालक बंधू भगिनी उपस्थित होते. सकाळपासूनच पालकांची वर्दळ गुरुकुलामध्ये होती. सदरील पालक मेळावा सुरू होण्यापूर्वी सर्व पालकांचे मुलांच्या हस्ते पूजन करण्यात आले . पूजन करते वेळी संपूर्ण गुरुकुलामधील वातावरण अत्यंत भावनिक व प्रसन्न झाले होते. या मातृ पितृ पूजन उत्सवानंतर प्रत्यक्ष कार्यक्रमाला सुरुवात झाली ते स्वामी विवेकानंद, महर्षी व्यास ऋषी व छत्रपती शिवरायांच्या प्रतिमापूजनाने. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री विनायकजी वझे, प्रमुख अतिथी दैनिक सकाळचे जिल्हा प्रतिनिधी दत्ता देशमुख, सरस्वती विद्यालयाचे मुख्याध्यापक गोरे सर, गहिले सर व पालक प्रतिनिधी म्हणून सुरेशराव घायाळ व संस्थेचे सचिव रोहिदास दादा रोहिटे उपस्थित होते.

# कृषिदूतांनी केली नियंत्रित पद्धतीने भात लागवडीचे प्रात्यक्षिक

**महाड । प्रतिनिधी**

रायगड भूमित शेतकऱ्यांना आधुनिक कृषि तंत्रज्ञानाची माहिती व्हावी यासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली संलग्न कृषी महाविद्यालय मोहोप्रे-आचळोली (महाड) च्या कृषिदूतांनी गोंडाळे गावात ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमा अंतर्गत शेतकऱ्यांना नियंत्रित पद्धतीने भात लागवड कशी करावी याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. चारसूत्री भात लागवड, एस. आर. टी. नियंत्रित पद्धत, श्री पद्धतीने भात लागवडीच्या पद्धतीची माहिती कृषिदूतांनी शेतकऱ्यांना सांगितली. अशा काही भात लागवडीच्या पद्धतींची माहिती कृषिदूतांनी शेतकऱ्यांना सांगितली. शेतकऱ्यांना भात लागवडीमध्ये या पद्धतीचा जास्तीत जास्त अवलंब करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यामध्ये त्यांनी कमी क्षेत्रामधून जास्तीत जास्त उत्पादन कशे मिळवता येईल हे शेतक-यांना सविस्तर सांगितले. या भात लागवड पद्धतीचे फायदे शेतकऱ्यांना पटवून दिले. शेतकरी नक्कीच या पद्धतीचा अवलंब करतील. कृषी महाविद्यालय म ोहोप्रे -आचळोलीचे प्राचार्य डॉ. व्ही. जे. गिम्हवणेकर आणि कार्यक्रम समन्वयक प्राध्यापिका व्ही. आर. पवार, कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक व विषयतज्ञ प्राध्यापक व्ही.ए. घुले कृषी महाविद्यालय आचळोली यांच्या मार्गदर्शनाखाली नियंत्रित पद्धतीने भात लागवडीचे प्रात्यक्षिक करून दाखवले. कृषि महाविद्यालय मोहोप्रे-आचळोली (महाड) कृषीदूतांमध्ये कु. ओंकार गोटे, कु. ऋत्विक शितोळे, कु. विनायक यमगर, कु. प्रणव शितोळे, कु. निखिल धुमाळ, कु. अनुराज सोनवणे, कु. श्रेयस भागवत, कु. रेवत गवई यांचा समावेश आहे. अशाच प्रकारे कृषिदूत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत राहतील. हे नक्कीच गोंडाळे गावातील बळीराजाला योग्य ते मार्गदर्शन करत राहतील.



# अपघातातील जखमीस अठरा लाख रुपये नुकसान भरपाई अँड योगेश टेकाडे यांच्या युक्तीवादामुळे मिळाले

**केवळ एक लाख सत्तर हजार रुपये मेडिकल बिले असताना, अँड योगेश टेकाडे यांच्या प्रभावी युक्तीवादा मुळे मा. जिल्हा न्यायाधीश यांनी रक्कम रुपये अठरा लाख रुपये विमा कंपनीला देण्याचे आदेश दिला**

**बीड । प्रतिनिधी**

रोड अपघातातील जखमीस अठरा लाख रुपये नुकसान भरपाई म्हणून मिळाले आहे. मौजे सौंदाना ता जि बीड येथील रहिवाशी असलेला जखमी ज्ञानेश्वर मूळूक याने दिनांक २०/०९/२०२० रोजी दीप हॉस्पिटल येथे जवाब दिला की, समक्ष विचारले वरुन सांगतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन मी खाजगी गाडीवर दिनांक १०/९/२०२० रोजी १७.०० वाजणेचे सुमारास मी व माझा मेहुणा नामे ऑमप्रकाश इंदूरे वय ३२ वर्षे आम्ही दोघेजण आमचे मोटार सायकल क्रमांक ाह-२३ रस.४३०२ हॉन्डा कंम्पनीची युनिकन वर बसुन परत गांवाकले जात असतांना वाटेत आमचे मोटार सायकल राष्ट्रवादी भवन समोर आली तेव्हा पाठी मागुन एक अँटो रिक्षा क्रमांक mh -23/R 0121 भरधाव वेगात आला त्याने आमचे मोटार सायकलला जोराची धडक दिली. त्यामुळे आम्ही रोडवर खाली पडलो माझ्या डोक्यास गंभीर दुखापत झाली आहे. माझ्या सोबत माझा मेहुणा ओमप्रकाश आश्रुबा इंदौरे यव ३२ वर्षे रा सौदाना हा पण गंभीररित्या जखमी झाला त्याचे तोंडाला कपाळाला मार लागला. त्यावेळी मी अपघात झाल्याने रोडवर पडुन जखमी होऊन बेशुद्ध झालो. मला जमलेल्या लोकांनी उचलुन फिनिक्स हस्पिटलमध्ये नेचुन रेफर केले. त्यानंतर डक्टरांनी एक दिवस ठेवुन मला दिप हस्पिटल येथे आणून ऍडमिट केले. याठिकाणी माझे डोक्याचे मोठे ऑपरेशन झाले आहे. तरी दिनांक १०/९/२०२० रोजी १७.०० वाजणेचे सुमारास मी व माझे मेहुणे नामे ओमप्रकाश आश्रुबा इंदौरे रा. सौदाना असे आम्ही दोघेजण पाली येथुन सौदाना या गावी परत जात असतांना बीड शहरातील राष्ट्रवादी भवनसमोर रोडवर पाठीमागुन एक बजाज कंम्पनीचा अँटोरिक्षाmh -23/R 0121 चे चालकाने त्याचे ताब्यातील अँटो रिक्षा हा हयगयीने व निष्काळजीपणाने भरधाव वेगात चालवून आमचे म ो.सा. ता पाठीमागुन जोराची धडक दिली. त्यामुळे मी व माझा मेहुणा रोडवर डवर पडुन गंभीररित्या जखमी झालो. माझे डोक्यास गंभीररित्या मोठी दुखापत होणेस रिक्षा चालक हा कारणीभुत झाला आहे. अशा प्रकारची तक्रार सदर रिक्षा चालका विरुद्ध शिवाजी नगर पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आली, त्यानुसार सदर रिक्षा चालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर सदर जखमीने वरील वाहन चालक ,मालक आणि विमा कंपनी यांच्या विरोधात जिल्हा न्यायालय बीड येथे अँड योगेश टेकाडे यांच्या मार्फत नुकसान भरपाई देण्यात यावी करीता दावा दाखल केलात्यासोबत पोलिसांनी केलेला एफ आय आर, घटना स्थळ पंचनामा, चार्जशीट ,डिसेबलिटी प्रमाणपत्र सह मेडिकल बिले एक लाख सत्तर हजार रुपये चे दाखल करण्यात आले. त्यानंतर सदरील प्रकरणात तक्रदार, तपासी अधिकारी पोलीस, डॉक्टर, यांच्या सह आय विटनेस असे एकूण चार साक्षीदार तपासण्यात आले. जखमी अर्ज दाराचे वकील यांनी केलेला युक्तिवाद ऐकून माननीय जिल्हा न्यायाधीश साहेब यांनी केवळ एक लाख सत्तर हजार रुपयांची मेडिकल बिले असताना, जखमी ज्ञानेश्वर गिन्यानदेव यास रक्कम रुपये ची नुकसानभरपाई विमा कंपनी कडून मंजूर केली..





माजलगाव अरुण आबा राऊत यांची भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य पदी निवड झाल्याबद्दल त्याचा सत्कार करताना संतोष रासवे मछिंद्र आढाव व सहकारी मित्र

# बहुचर्चित बनावट आरटीओ प्रकरणात आरोपीस जामीन

**राज्यभर गाजलेलं प्रकरणात ॲड.शशिकांत सावंत यांच्या युक्तिवादाला यश**



**बीड । प्रतिनिधी**

बनावट आरटीओ अधिकारी बनून वाहनचालकांची फसवणूक करणाऱ्या बहुचर्चित प्रकरणात अटकेत असलेल्या आरोपीस बीड सत्र न्यायालयाने ९ जुलै रोजी जामीन मंजूर केला. आरोपीच्यावतीने सुप्रसिद्ध ॲड.शशिकांत सावंत यांनी युक्तिवाद सादर केला होता.

८ मे २०२५ रोजी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात मोटर वाहन निरीक्षक गणेश विघ्ने यांनी फिर्याद दिली होती. फिर्यादीप्रमाणे अजय बालाजी गाडगे व दिनेश मंगल धनसर हे दोघे, आर.टी.ओ. अधिकाऱ्याचा गणवेश घालून व सरकारी स्टिकर्स व लोगो लावलेल्या स्कॉर्पिओ गाडीतून जालना रोडवर वाहनचालकांना अडवून पैसे उकळत होते. त्यांनी स्वतःला आयपीएस अधिकारी असल्याचे भासवून फसवणूक केली होती. या प्रकरणात गुन्हा र.क्र.१२८/२०२५ नुसार भादंवि कलम ३१८(४), २०४, २०५, १२६(२), ३(५) BNS अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. जिल्ह्यातच नव्हे तर राज्यभर गाजलेले हे प्रकरण मीडियामध्ये मोठ्या प्रमाणात चर्चेत आले होते.

**• कायदेशीर युक्तिवादा मागील टीम**

**या प्रकरणात आरोपीच्यावतीने युक्तिवाद करणारे ड. शशिकांत सावंत यांनी सशक्त भूमिका बजावली. त्यांना ॲड.विशाल राम कदम, ॲड.अभिषेक बहिर, ॲड.मुकुंद लोणकर, ॲड. माऊली डाके, ॲड. राजकुमार धरणे, ॲड.प्रदीप दराडे व ॲड. देवराज ठोंबरे ॲड. विजय डोके यांचे सहकार्य लाभले.**


**दैनिक मराठवाडा पत्र** — दि. १९/०६/२०२५

**टी.सी. हरवला आहे.**

अभय आत्माराम जमाले या नावाचा इयत्ता १२ वी चा टि.सी वडवणी ते बीड प्रवासात हरवला आहे.

सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क करावा.

**संपर्क : ९४२३३७८०८०**


## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती डी. के. पाटील साहेब ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज ७६६/२०२५**

**श्रीमंत विरुध्द निरंक**

अर्जदार :- १) श्रीमंत पि.वामनराव खराडे वय ७६ वर्षे धंदा शेती २) आश्रूबा पि.वामन खराडे वय ६२ वर्षे धंदा शेती ३) संदिपान - पि. वामन खराडे वय ५१ वर्षे धंदा शेती सर्व रा.म्हाळसापूर, ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे **वामन पि. रावसाहेब खराडे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत नामे वामन पि. रावसाहेब खराडे रा. म्हाळसापूर ता. जि.बीड यांचा मृत्यु दिनांक : ०८.०३.२०११ रोजी म्हाळसापूर ता.जि.बीड येथे झाला. अर्जदार क १ ते ३ हे मयताचे मुले आहेत. मयतास सदर अर्जदारांशिवाय ईतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रम ाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत- कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांना सदरहु मयत वामन पि. रावसाहेब खराडे यांचे देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/०५/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक १२/०८/२०२५**

**(ॲड. रोटे डी. एम.)**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) | शिक्का | (स्वाक्षरीत)
क.लिपीक | | अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड यांचे कार्यालय

**शासकीय ईमारत, चांदमारी वसाहत, धानोरा रोड, बीड- ४३११२२**

दुरध्वनी क्र.०२४४२-२९९१४० ई-मेल dsorbeed@yahoo.com

क्रमांक/आस्था-२/एस. आर. १६० / २०२४/२५ — बीड दिनांक- ०४/०७/२०२५

**जाहीर सुचना**

प्रति,

अपीलदार: १. मारोती नामदेव काकडे (मयत) वारस ,
१) वामन मारोती काकडे,
२) सुधाकर मारोती काकडे
३) भागवत मारोती काकडे (मयत) वारस
३/१) दादासाहेब भागवत काकडे, ३/२) रणजित भागवत काकडे
सर्व रा.मु. जरूड पो. शिवणी ता. जि. बीड

विरुध्द

जाबदार : १. १) उपअधिक्षक भुमी अभिलेख, बीड, २) तलाठी सज्जा, जरूड, ३) प्रकाश बप्पासाहेब काकडे, ४) सागरबाई बाबासाहेब काकडे, ५) गंगुबाई प्रकाश काकडे, ६) कृष्णा प्रकाश काकडे ७) पांडूरंग श्रीमंतराव काकडे, ८) दिपक श्रीमंतराव काकडे ९) सुहास श्रीमंतराव काकडे, १०) बबीताबाई शामराव, ११) रामा नामदेव काकडे, १२) गहीनीनाथ शामराव काकडे, १३) नवनाथ एकनाथ काकडे, १४) बळीराम साहेबराव काकडे, १५) लक्ष्मण साहेबराव काकडे, १६) केशव साहेबराव काकडे, १७) बन्सी साहेबराव काकडे, १८) ज्ञानेश्वर साहेबराव काकडे, १९) बाबासाहेब बळीराम काकडे, अ.क्र. २ ते १९ रा. जरूड पो. शिवणी ता. जि. बीड, २०) शहादेव सुदाम कुटे, २१) गोवर्धन परभत कुटे, २२) मुकंदा गोविंदा कुटे, २३) संजय गोविंदा कुटे, २४) शिवाजी गोविंदा कुटे, २५) सखाराम रामभाऊ कुटे २६) चंद्रकांत गोविंदा कुटे, २७) त्रिशाला अंकुशराव कुटे, २८) राजकुमार अंकुशराव कुटे, २९) नंदकुमार अंकुशराव कुटे, अ.क्र. २० ते २९ रा. कुटेवाडी पो. शिवणी ता. जि. बीड, ३०) शेषेराव दामोधर येवले, ३१) मच्छिंद्र नामदेव जाधव, अ.क्र. ३० ते ३१ रा. बाभुळखुंटा पो. मौज ता. जि. बीड, ३२) चंद्रकांत हनुमान चन्ने, रा. गुंधा (वडगांव) पो. पिंपळनेर ता. जि. बीड, ३३) सुजाता सुभाष सपकाळ रा. भक्ती कन्स्ट्रक्शन, नगर रोड, बीड ता. जि. बीड

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करण्यात येते की, अर्जदार यांनी गैरअर्जदार यांचेविरुध्द जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड यांचे न्यायालयात मौजे जरूड ता. जि. बीड येथील सर्व्हे नं. १०५ मधील पोट-हिस्सा मोजणी फाळणी बारा फेरफार क्र. ३११ अन्वये हिस्सा क्र. ४ व ५ पुरवणी सातबारा बाबत अपील महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील अर्ज दाखल केलेले आहे.

वरील गैरजअर्जदार यांना जाहीर सुचनेव्दारे कळविण्यात येते की, वरील प्रकरणी दिनांक ०६/०८/२०२५ रोजी वेळ सकाळी / दुपारी ११:३० वाजता जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड यांचे कार्यालय, चाँदमारी शासकीय वसाहत, पालवण चौकाजवळ, धानोरा रोड, बीड ता. जि. बीड यांचे समोर सुनावणी आहे. वरील नमुद गैरअर्जदार यांनी नमुद तारखेस न्याय कक्षेत सुनावणीस उपस्थीत रहावे.

**वरील नमुद गैरअर्जदार, वरील नमुद तारखेस गैरहजर राहील्यास प्रकरणात एकतर्फी सुनावणी घेण्यात येईल व प्रकरण पुढे चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

शिक्का

**स्वाक्षरीत / -**
**(कृष्णा शिंदे)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड**

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा. के सी बागल मॅडम, ६ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : ८३६ /२०२५**

**विमल व इतर - वि . - निरंक**

ज्याअर्थी मयत नामे एकनाथ पि. रामभाऊ पवार रा. भवानवाडी ता. जि. बीड हे दि. १९.११.२०१३ रोजी मौजे भवानवाडी ता. जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार- १) विमल एकनाथ पवार २) विलास एकनाथ पवार ३) राहुल एकनाथ पवार ४) पुजा एकनाथ पवार ५) मिराबाई रामभाउ पवार अ.पा.क आई अर्जदार क्र. १ सर्व रा. भवानवाडी ता. जि. बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे एकनाथ पि. रामभाऊ पवार रा. भवानवाडी ता.जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज १३/०५/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : ३०.०६.२०२५

**( मार्फत - ॲड. जी. एम. केकान बीड )**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) | शिक्का | (स्वाक्षरीत)
क.लिपीक | | अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा.श्रीमती. एस. डी. सोनी, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १०८४/२०२५**

**शांताबाई विरूध्द निरंक**

अर्जदार - १. शांताबाई अ. हरिभाउ धसे, वय ७९ वर्षे, धंदा घरकाम, रा. मंझरी हवेली, ता.जि. बीड, २. तुकाराम पि. हरिभाउ धसे, वय ३९ वर्षे, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे, ३. अशोक पि. हरिभाउ भसे, वय ४५ वर्षे, धंदा शेती, य. वरील प्रमाणे, ४.मंगल सर्जेराव बहिरवाळ, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरील प्रमाणे, ५. पार्वती राजेंद्र गुजर, वय ५७ वर्षे, धंदा घरकाम, रा. नाळवंडी, ता.जि. बीड

विरुध्द निरंक

**मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत हरिभाउ माणिकराव धसे,** यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत हरिभाउ माणिकराव धसे, यांचा मृत्यु दिनांक ०७/११ / २०२४ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत हरिभाउ माणिकराव धसे, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत हरिभाउ माणिकराव धसे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८/०७/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ११/०८/२०२५ आहे.**

**(ॲड. एम. डी. धांडे यांचे मार्फत)**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) | शिक्का | (स्वाक्षरीत)
क.लिपीक | | अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा. ये. वाघ ५ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०६९/ २०२५**

**मैनावती वि. निरंक**

ज्याअर्थी - लहु गंगाराम खंदारे, हे दिनांक १४.०७.२०२४ रोजी कारेगव्हाण, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. त्याअर्थी-

१ मैनावती भ्र. लहु खंदारे, वय- ४० वर्षे, धंदा - घरकाम रा. कारेगव्हाण, ता. जि. बीड
२. राजेंद्र पि. लहु खंदारे, वय- २२ वर्षे, धंदा- शेती रा. वरील प्रमाणे
३. लक्ष्मण पि. लहु खंदारे, वय - १७ वर्षे, धंदा - शिक्षण अज्ञान
अ.पा.क. आई, अर्जदार न. १ रा. वरील प्रमाणे.
४. सुवर्णा भ्र. सदाशिव दाराडे, वय- २३ वर्षे, धंदा - घरकाम रा. कारेगव्हाण, ता. जि. बीड

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे तसेच अर्जदार क्र. २ व ३ हे मयताची मुले असुन अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना / अर्जदाराला सदरहु मयत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख ०७.०८.२०२५ ही आहे.**

**(ॲड. एस. बी. शिंदे यांचे मार्फत)**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) | शिक्का | (स्वाक्षरीत)
क.लिपीक | | अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्री आर. जी. बागडे साहेब, ६वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १०७० / २०२५**

**पार्वती विरुद्ध निरंक**

अर्जदार- १. पार्वती भ्र. नवनाथ खंदारे, वय - ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. कारेगव्हाण, ता. जि.बीड, २. हनुमंत पि. नवनाथ खंदारे, वय २५ वर्षे, धंदा- शेती, रा. वरील प्रमाणे, ३. मीरा भ्र. श्रीराम नागरगोजे, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. भवानवाडी,ता.जि.बीड ४. ताई भ्र. बापुराव घुगे, वय - २८ वर्षे, धंदा घरकाम, रा. कारेगव्हाण, ता. जि. बीड. ५. कांती भ्र. गणेश वडणे, वय २१ वर्षे, धंदा घरकाम, रा. चिखलबीड, ता.वडवणी जि.बीड

**मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नवनाथ पि. गंगाराम खंदारे मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत नवनाथ पि. गंगाराम खंदारे यांचा मृत्यु दिनांक २१/१०/२०२३ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत नवनाथ पि. गंगाराम खंदारे यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निम शासकीय कामासाठी मयताचे सदरहू अर्जदार सदरहू सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत नवनाथ पि. गंगाराम खंदारे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८/०७/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २१/०८/२०२५ आहे.**

**(ॲड. एस. बी. शिंदे यांचे मार्फत)**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) | शिक्का | (स्वाक्षरीत)
क.लिपीक | | अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

दैनिक
● https://marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
शनिवार, दि.१२ जुलै २०२५ पान ४

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाची थेट कर्ज योजना

**बीड । प्रतिनिधी**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाकडून (मर्या.) सन २०२५-२६ वर्षात थेट कर्ज योजना राबवण्यात येत आहे. जिल्ह्यातील मातंग समाजातील अंतर्भूत १२ पोटजातींच्या पात्र इच्छुकांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक प्रणिता बोराडे (सरपते) यांनी केले आहे. महामंडळमार्फत राबविण्यात येणाऱ्या थेट कर्ज योजनेंतर्गत, मोबाईल रिपेअरिंग, इलेक्ट्रॉनिक वस्तू दुरुस्ती, फॅब्रिकेशन, ब्युटीपार्लर, टेलरिंग, फूड प्रोसेसिंग, किराणा दुकान, प्रिंटींग, कॅटरिंग सेवा, हॉटेलिंग, खेळ साहित्य विक्री, रेडीमेड कपड्यांचे दुकान अशा विविध लघु व्यवसायांसाठी कर्ज प्रकरणे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक ▶▶ उर्वरित पान २ वर

# 'पीककर्जामुळे शेतकऱ्यांच्या खात्याला होल्ड न लावता मुदतवाढ द्या'

### ● आ.संदीप क्षीरसागरांची प्रशासनाकडे मागणी



**बीड । प्रतिनिधी**

शेतकर्यांनी पीककर्ज न भरल्याने आणि रिनिव्हल न केल्याने संबंधित बँकेकडून शेतकर्यांचे बचत खाते होल्ड केली जात आहेत. परंतु, सध्या शेतकऱ्यांची शेतीविषयक कामे सुरू आहेत आणि अनेक शेतकऱ्यांचे पाल्य विविध क्षेत्रात शिक्षण घेत आहेत. अशाप्रकारे बचत खाते होल्ड केल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे बँक अकाउंट होल्ड न करता मुदतवाढ अथवा इतर काही पर्याय करण्यात यावा अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाकडे केली आहे.

बीड विधानसभा मतदारसंघ अनेक शेतकऱ्यांनी पीककर्ज न भरल्याने त्यांच्या बचत खात्यावर संबंधित बँकेकडून होल्ड लावला असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या होत्या. यावर आ.संदीप क्षीरसागर यांनी, शेतकऱ्यांना पीककर्ज भरण्याबाबत बचत खाते होल्ड न करता इतर नियमोचित व्यवस्था अथवा मुदतवाढ प्रणालीचा वापर, करून तगादा न लावता, कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये याची काळजी घेत मार्ग काढण्याची मागणी केली आहे. याबाबतीत जिल्हा अग्रणी बँक प्रशासन, विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी मागणी केली आहे.

## राज्यांतर्गत पीक स्पर्धा २०२५-२६ : शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी संधी

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात कृषी उत्पादन वाढवण्यासाठी शासन दरवर्षी पीक स्पर्धा योजना राबविते. सन २०२५-२६ साठीही अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य उत्पादनात प्रगती करणाऱ्या प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ही स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. तालुका, जिल्हा व राज्य स्तरांवर ही स्पर्धा होणार आहे. सहभाग घेणाऱ्या शेतकऱ्यांची निवड त्यांच्या उत्पादकतेवर आधारित असेल.

खरीप हंगामात भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमुग व सुर्यफुल या एकूण ११ पिकांसाठी स्पर्धा घेतली जाणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांकडे त्यांच्या नावे जमीन असणे व ती स्वतः कसणे आवश्यक आहे. एकाचवेळी एकापेक्षा अधिक पिकांसाठी स्पर्धेत भाग घेता येतो. मात्र, त्या प्रत्येक पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असावी. अर्जासाठी विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ), प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, ७/१२ व ८-अ उतारा, जात प्रमाणपत्र

▶▶ उर्वरित पान २ वर

# संपादकावर हल्ला करणे संस्था चालकाला भोवले, पत्रकार एकजुटीचा विजय



### ● वरिष्ठांचे आदेशावर सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड यांची उत्तम कामगिरी

**सदरील प्रकरणात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे वतीने निवेदन देण्यात आल्यानंतर पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी या प्रकरणाची तत्काळ दखल घेऊन अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांना पडताळणी व कारवाईचे आदेश दिले वरिष्ठांचे आदेशावर बीड शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड यांनी उत्तम कामगिरी करत या प्रकरणाची परतावाणी करून शेवटी पत्रकारांना नाय देण्याचे काम केले आहे पत्रकार संरक्षण कायदा २०१७ अंतर्गत जिल्ह्यात दाखल होणारा हा पहिलाच गुन्हा असून या आधारे पत्रकारांना संरक्षण मिळण्याचे मार्ग मोकळे झाल्याचे दिसून येत आहे या काम गिरीबद्दल जिल्ह्याभरातून सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड यांच्या आभार व्यक्त केला जात आहे**

**बीड । प्रतिनिधी**

संस्थेतील शाळेच्या विरोधात बातम्या का छापल्या ? या कारणावरून संस्था चालक मिर्झा सईद बेग अनवर बेग आणि शिक्षक कागझी एकरार यांनी दै.बीड संघर्षचे संपादक खमरूल इमान यांच्यावर हल्ला केल्याची घटना घडली होती. या प्रकरणात बीड शहर पोलीसांनी केवळ एनसी दाखल केली होती. त्यामुळे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या शिष्टमंडळाने काल दुपारी पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांची भेट घेऊन त्यांना मारहाणीचे सीसीटीव्ही फुटेज दाखवले. त्याचबरोबर या प्रकरणात पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करावा अशी मागणी केली.

▶▶ उर्वरित पान २ वर

# जयभवानीचे नऊ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट:अमरसिंह पंडित

### जयभवानी सहकारी साखर कारखान्याचा ४३ वा रोलर पुजन समारंभ संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या ४३ व्या गळीत हंगामाची संपुर्ण तयारी झाली असून या गळीत हंगामात नऊ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात येत असल्याचे प्रतिपादन जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी केले. जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या २०२५-२६ च्या गळीत हंगामासाठी कारखान्याचे रोलर पुजन करताना ते बोलत होते.



जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या २०२५-२६व्या गळीत हंगामाची सुरुवात करण्याच्या दृष्टीने रोलर पुजन हा पहिला टप्पा आज बुधवार दिनांक ९ जुलै २०२५ बुधवार रोजी श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. महंत जनार्धन महाराज यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, व्हा.

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्हयातून बदलून गेलेल्या अधिकाऱ्यांचा ही येथील लोक जिव्हाळा ठेवतात : प्रा.ईश्वर मुंडे

### अधिवेशनादरम्यान नवल किशोर राम व प्रा.ईश्वर मुंडे यांची भेट

**मुंबई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती व शेती अधारीत उत्पन्न कमी आसले तरी बीड जिल्ह्यातील लोक कष्टाळू,मेहनती तेवढेच प्रेमळ आहेत. बीड जिल्ह्यात अधिकारी म्हणून आलेल्या प्रमाणीक अधिकाऱ्यांना सहकार्य व प्रेम देऊन त्यांना डोक्यावर घेतात याची अनेक उदाहरणे घडलेले आहेत.

या मध्ये महाराष्ट्र राज्याचे विद्यमान मुख्य सचिव राजेश कुमार,सेच्छा सेवानिवृत्त विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर तसेच नवल किशोर राम,आशोक



धिवरे,अखिलेश कुमार या आय.ए.एस. व आय. पी.एस.अधिकाऱ्यांची ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड तालुक्यातील सरपंच पदाची मंगळवारी आरक्षण सोडत

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील १७५ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांच्या आरक्षणाची सोडत मंगळवार, १५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, बीड येथील बैठक सभागृहात होणार आहे. तालुक्यातील सर्व नागरिकांनी सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले आहे. महाराष्ट्र ग्राम पंचायत निवडणूक नियम, १९६४ च्या नियम ३ (अ) प्रमाणे तालुकानिहाय २०२५ ते २०३० या कालावधीत गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतीकरीता आरक्षित करुन संख्या निश्चित करण्यात आली आहे. सरपंच पदाचे अनुसूचित जाती, जमाती, मागास व खुला प्रवर्ग या प्रवर्गातील महिला आरक्षणासह आरक्षण सोडतीकरीता नियंत्रक अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी

▶▶ उर्वरित पान २ वर

# विद्यार्थ्यांनी दर्जेदार शिक्षणातून उज्ज्वल भविष्य घडवले पाहिजे - विजयकांत मुंडे

### रेणुकामाता कृषी विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**केज। प्रतिनिधी**

स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी दर्जेदार शिक्षणातून उज्ज्वल भविष्य घडवले पाहिजे असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे सदस्य विजयकांत मुंडे यांनी विद्यार्थी गुणगौरव सम रंभा प्रसंगी केले आहे.





विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ (सा) ता.केज, मिराबाई शिक्षण प्रसारक मंडळ माळेगांव ता.केज व रेणूकामात कृषि विकास प्रतिष्ठाण देवगाव यांच्या अंतर्गत असलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तथा व्यावसायिक अभ्यासक्रमातील शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव व गुरूपोर्णिमा सोहळ्याचे आयोजन दिनांक १० जुलै २०२५ रोजी रेणूकामाता सामाजिक सभागृह रामकृष्णगड (आंबळाचे बरड) येथे करण्यात आले होते. गुरूपोर्णिमेच्या निमित्ताने सकाळी ११ ते १ यावेळेत ह.भ.प गंगाधर महाराज यादव यांचे सुश्राव्य किर्तन संपन्न झाले.त्यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याला प्रारंभ करण्यात आला.कार्यक्रमाच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# लाचखोर मुख्याधिकारी चव्हाणला १४तारखे पर्यंत न्यायालयीन कोठडी

**माजलगांव । प्रतिनिधी**

गुत्तेदाराच्या २ कोटीच्या बीलातील कमिशन म्हणून सहा लाख रुपयांची लाच घेताना माजलगांव नगर परिषदेचे मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यास लाचलुचपत विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडल्यानंतर शुक्रवारी न्यायालयासमोर हजर केले असता त्यांस न्यायालयीन कोठडी सुनावन्यात आली.

- शासनाच्या नगर उत्थान अभियान योजनेअंतर्गत केलेल्या सिमेंट रस्त्याच्या २ कोटीच्या कामातील बिलाबद्दल कमिशन म्हणून ६ लाख रुपये व दुसऱ्या कामातील अडथळे, अतिक्रमण काढून घेण्यासाठी ६ लाख अशी १२ लाख रुपयांची लाचेची मागणी मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांनी केली होती. परंतु ही मागणी मान्य नसल्याने तक्रारदार यांनी यासंदर्भातील तक्रार छत्रपती संभाजीनगर लाचलुचपत विभागाकडे केली. तक्रारीची सत्यता पडताळल्यानंतर या विभागाच्या पथकाने गुरुवार दिनांक १० रोजी रात्री सापळा रचला. माजलगाव शहरातील पिताजी नगरी येथे किरायाच्या घरी चव्हाण याने सहा लाख रुपयांची लाच स्विकारली. यावेळी छत्रपती संभाजीनगर येथील पथकप्रमुख पोलीस निरीक्षक केशव दिंडे

▶▶ उर्वरित पान २ वर

## चकलंबा येथील जिल्हा परिषद माध्यामिक शाळेचे तीन विध्यार्थी स्कॉलरशिप परीक्षेत पात्र



**चकलंबा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चकलंबा शाळेचे स्कॉलरशिप परीक्षा सन-२०२४-२५ या परीक्षेत पाचवी वर्गातील १)गार्गी भागवत घाडगे २)कृष्णा सोमनाथ खेडकर हे दोन विद्यार्थी स्कॉलरशिप धारक झाले आहे. तसेच आठवी वर्गातील १)यश सचिन घोडके हा एक विध्यार्थी स्कॉलरशिप धारक झाला आहे.या तीनही विध्यार्थ्यांना सरकार तर्फे पुढील तीन वर्ष भरघोस शिष्यावृत्ती रक्कम मिळणार आहे. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक करणारे श्री. गणेश पाचर्णे सरांचे विशेष अभिनंदन तसेच पालक श्री. भागवत घाडगे, श्री. सोमनाथ खेडकर व श्री. सचिन घोडके.तसेच वेळोवेळी सहकार्य करणारे मुख्याध्यापक श्री. गर्कळ बी. एल.सर आणि माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षकवृंद व शिक्षिका यांचे अभिनंदन.

# वैद्यनाथ विद्यालयाच्या १५ शिक्षक कर्मचाऱ्यांकडुन रणजित देशमुख, सादेक इनामदाराच्या खोट्या तक्रारीची पोलखोल

### अब्रुनुकसानीचा सामुहिक दावा ठोकणार : शिक्षण उपसंचालक,पोलीस अधिक्षक व जिल्हाधिका-यांची शिक्षक शिष्टमंडळानी घेतली भेट

**परळी । प्रतिनिधी**

येथील वैद्यनाथ विद्यालयातील तब्बल पंधरा शिक्षक कर्मचाऱ्यांची आर्थिक पिळवणूक व मानसिक त्रास देण्याच्या उद्देशाने खोट्या माहिती घेऊन तक्रारी करणारा रणजित देशमुख, सादेक इनामदार यांच्या तक्रारीत कसल्याच प्रकारचे तथ्य नसुन केवळ आमच्या कडून पैसे उखळणे,धमकावण्याच्या उद्देशाचा शिक्षकांनी पुरावे



दाखवत पत्रकार परिषदेत पर्दाफाश केला असुन लवकरच आम्ही सामुहिक संबंधित खोट्या तक्रार दाखल करणाऱ्या लाचखोरावर अब्रुनुकसानीचा दावा ठोकणार असुन बीड जिल्हयाचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना.अजित पवार साहेब, शिक्षण मंत्री यांची भेट घेणार असल्याचे सांगितले.

दरम्यान मंगळवार दि.८ रोजी शिक्षण उपसंचालक, जिल्हाधिकारी बीड,पोलीस अधिक्षक व शिक्षणाधिकारी बीड यांच्यासह अधिकारी यांची

▶▶ उर्वरित पान २ वर

